
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318


Special Issue, January 2018

International Multilingual Research Journal

Vidyawarta®



# मराठा कालखंडाचे विविधांगी आकलन



डॉ.नंदकुमार जाधव
(इतिहास विभाग प्रमुख)

डॉ.गोविंदराजे निंबाळकर
(प्राचार्य)

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

UGC Approved
Jr.No.62759

Special Issue
January 2018

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

व

नेताजी शिक्षण संस्थेचे

## सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय

(कला, वाणिज्य व विज्ञान

(नॅक मूल्यांकित बी ग्रेड

इतिहास विभाग

आयोजित

दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र

# मराठा कालखंडाचे विविधांगी आकलन

दि. १९ व २० जानेवारी २०१८

डॉ. नंदकुमार जाधव
प्रमुख संपादक

प्रा. शोभा वाईकर
सहसंपादक

डॉ. गोविंदराजे निंबाळकर
प्राचार्य

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# || Index ||

1) छत्रपती शिवाजी महाराजांचे जमीन महसुल धोरण
**प्रा.भाऊसाहेब खंडु सांगळे, मंचर** ||9

2) ऐतिहासिक मराठी चित्रपटातून व्यक्त झालेला मराठ्यांचा इतिहास
**प्रा.के.जे.चव्हाण, भोर** ||12

3) सृष्टीकर्ते छत्रपती शिवाजी महाराज
**प्राचार्य डॉ. दीपक देशपांडे, भिलवडी** ||16

4) बाजीराव—मस्तानी : एक यशस्वी चित्रपट
**प्रा.डॉ.संजय दगडू घोडेकर, जि.पुणे.** ||20

5) खर्ड्याची लढाई : एक अभ्यास
**डॉ. भूषण गोविंद फडतरे, जि. पुणे** ||24

6) शिवछत्रपतींचे सामाजिक आकलन
**डॉ.भाऊसाहेब दा. गव्हाणे, जि.पुणे** ||29

7) इमानी शेलारमालुसरे घराण्याला मिळालेली वंश परंपरागत पारगडची किल्लेदारी...
**प्रा.डॉ शामराव घाडगे, बारामती** ||32

8) शिवशाही व मराठेशाहीचा ऐतिहासिक नवा संदर्भ ग्रंथ-'पुरंदरचे धुरंधर'(२०१६) (लेखक...
**प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी, जि. पुणे** ||34

9) मराठ्यांच्या इतिहासात किल्ल्यांचे महत्व
**प्रा.डॉ.भारती शंकरराव नवथर., अहमदनगर.** ||37

10) मराठेकालीन माळव्याच्या राज्यव्यवस्थेतील साहुकारांचे योगदान : होळकर राज...
**सचिन अभिमन्यू ओहोळ, पुणे** ||39

11) छत्रपती शिवाजी महाराज : आर्थिक संरक्षण धोरणाचे प्रणेते
**डॉ.पठारे उत्तम आप्पासाहेब, पुणे.** ||42

12) मराठा कालखंडातील मंदिरस्थापत्य विशेषसंदर्भ : सोमेश्वर मंदिर, पाषाण, पुणे.
**डॉ. स्वाती काळभोर, पुणे .** ||46

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

01

# छत्रपती शिवाजी महाराजांचे जमीन महसुल धोरण

प्रा.भाऊसाहेब खंडु सांगळे
इतिहास विभागप्रमुख,
अण्णासाहेब आवटे कॉलेज,मंचर

**********

**प्रस्तावना :—**

प्राचीन काळापासून भारत हा शेतीप्रधान देश आहे. भारतातील खेडी प्राचीन व मध्ययुगीन काळात स्वयंपूर्ण होती. मध्ययुगातील गावगाडयाचे जीवन प्रामुख्याने शेतीवर आधारीत होते. त्यामुळे स्थिर राजकीय सत्ता प्रस्थापित करण्यासाठी शेतीकडे लक्ष देणे महत्वाचे होते, कारण मध्ययुगात जमीन महसुल ही राज्याची कायमस्वरूपी उत्पन्नाची बाब होती.शिवाजी महाराजांपूर्वी शेरशहा सुरी, अकबर, मलिक अंबर आदींनी जमीन महसुलपध्द्तीतून राज्याच्या तिजोरीत भर पडावी म्हणून शेतीकडे लक्ष दिलेले दिसते. छ.शिवाजी महाराजांनीही तोच धागा पकडून जमीन महसूल वृध्द्रीसाठी व शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विशेष लक्ष पुरविले, व त्या अनुषंगाने जमीन महसुल व कृषीविषयक धोरण राबविले.आजच्या काळात शेतीविषयक सुधारणा केल्या जातात,मात्र शेतकऱ्यांना त्याचा संपूर्ण लाभ मिळताना दिसत नाही. त्यामुळे छ.शिवाजी महाराजांच्या जमीन महसुल व कृषीविषयक धोरणाचा अभ्यास करण्याची गरज वाटते. म्हणूनच जमीन महसुलपध्द्ती, शेती सुधारणा यांचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेतलेला आहे.

**जमीन महसुलपध्द्ती :—**

जमीन महसुलपध्द्तीत खेडे हा महत्वाचा घटक होता. खेडणे याचा अर्थ शेती करणे व जेथे शेती केले जाते ते खेडे होय. शेती हा खेडयातील प्रमुख व्यवसाय होय. खेडयातील जमीनीचे पांढरी ( लोकांचे वस्तीस्थान ) व काळी ( शेतजमीन ) असे दोन प्रकार पडले.[1] महाराष्ट्रातील जमीन डोंगराळ,गवताळ व काळया मातीची आहे. यामध्ये नापीक जमीनीचे प्रमाणही खुप आहे.[2] त्यामुळेच पिकण्यायोग्य जमीन ज्या शेतकऱ्याकडे आहे,त्यांना गावात मानाचे स्थान राहिलेले दिसून येते. पूर्वीच्या काळात असणारी जमीनीबाबतची वतनदारी पध्द्त नष्ट करून शेतकऱ्यांना लुटणाऱ्या दलालांचे राजांनी उच्चाटन केले, व जमीन महसूल वसुलीसाठी अधिकाऱ्यांची उतरंड तयार केली. परगण्यात देशमुख व देशपांडे, कसब्यात शेटे व महाजन तर खेडयात पाटील व कुलकर्णी हे अधिकारी जमीन महसूल जमा करत होते. शेतसारा निश्चित करण्यासाठी जमीनीची मोजणी करून प्रकार पाडण्यात आले.

**जमीनीची मोजणी व प्रकार :—**

शिवकाळापूर्वी जमीन मोजणीसाठी दोर किंवा साखळीचा वापर होत असे. छ.शिवाजी महाराजांनी जमीनीची मोजणी करण्यासाठी पाच हात व पाच मुठी लांब असणारी काठी हे परिमाण वापरात आणले. ती काठी शिवशाही काठी म्हणूनही ओळखली जाते. छ. शिवाजी महाराजांच्या काळात तीन वेळा जमीनीची मोजणी झाली. प्रथम १६३६ मध्ये दादोजी कोंडदेवांनी नंतर १६४८ मध्ये मोरोपंत पिंगळे व १६७८ मध्ये अण्णाजी दत्तोंकडून जमीन मोजणी केली. प्रत्येकवेळी महसुल पध्द्ती अधिकाधिक सुधारीत करण्यात आली. महसुल हा तिच्या मगदुराईवर (जमीनीची प्रत) व तिच्यातून होणाऱ्या उत्पन्नावर ठरविला जात असे. त्यासाठी जमीनीची प्रतवारीनुसार विभागणी केली जाई. केवळ भाताच्या पिकाच्या जमीनीचे उत्पन्नानुसार बारा प्रकार पाडले होते. प्रत्येक प्रकारच्या जमीनीचा महसूल वेगवेगळा होता.चांगल्या प्रतीच्या जमीनीवर प्रत्येक बिघ्याला साडे बारा मण व निकश्ष्ट प्रतीच्या जमीनीवर प्रत्येक बिघ्याला ५ मण महसूल घेतला जाई. जमीनीची प्रत प्रत्येक गावची वेगवेगळी असे.[3] सारा निश्चित करताना लागवडीखालील जमीन व त्यात येणारी पिके यांचा विचार होई, पडीक जमीन , जंगल , कुरण याचा विचार होत नसे.[4] जिरायत जमीनीत अव्वल , दुम , सीम व चारहम असे प्रकार तर कोकणात मुरमाड , धुळपट व दरपट असे प्रकार होते.

**महसुलाचे दर व स्वरूप :—**

महसुल दर गावचे वतनदार, सरकारी अधिकारी व रयत यांच्या विचाराने ठरविला जाई. जमीनीच्या एकुण उत्पन्नाच्या २/५ इतके उत्पन्न महसुल रूपाने घेतले जात असे. काही ठिकाणी धान्य, शेतमाल तर काही ठिकाणी रोख स्वरूपात सारा वसुल केला जात असे.परगणा व सुभ्याच्या अधिकाऱ्यांनी जमा झालेला शेतमाल चांगला दर पाहून बाजारात विकावा व त्याचे रोख पैसे करावेत अशी राजांची ताकीद होती. मोगल बादशहा औरंगजेब त्याच्या राज्यात उत्पन्नाच्या १/२ महसुल जमा करत असे. त्यापेक्षा कमी दराने शेतसारा वसुल केला जात असे.[५]

सारा निश्चितीसाठी लागवडीखाली येणारी जमीन व त्यात येणाऱ्या पिकांचा विचार करून नख्त व ऐनजिनसी अशा दोन्ही स्वरूपात सारा वसुली होई. नख्त दर बागायती जमीनीवर आकारला जाई. १६७७ पासून राजांनी स्वराज्यात बटाई पध्द्त सुरू केली. त्यानुसार १/२ भाग महसुल वसुल केला जाई. जेथे बटाई पध्द्त असेल तेथे शेतकऱ्यांना इतर कर माफ असे. दुष्काळात शेतकऱ्यांना सारा माफ करून त्यांना मदतही केली जात असे.[६]

**महसुल व्यवस्था :—**

राज्याचे मुख्य उत्पनाचे साधन शेतसारा होता. मराठा स्वराज्य व मोगलाई असे दोन भाग होते. स्वराज्यातून महसुल तर मोगलाईतून राजांना खंडणी मिळत असे. प्रत्येक महालाचे सरासरी उत्पन्न सव्वा लाख होनां पर्यंत असे. स्वराज्याचा एकुण वार्षिक महसुल ५० लाख होन इतका असावा. याशिवाय खंडणी व लुट वेगळीच होती.

**रयतवारी पध्द्ती :—**

राजांनी जमीनदारी पध्द्तीऐवजी रयतवारी पध्द्तीचा पाया घातला. यापूर्वी गावचा महसुल पाटील कुलकर्णी, परगण्याचा देशमुख देशपांडे वंशपरंपरेने करत. स्थानिक अधिकारी रयतेवर अत्याचार करून जमीन महसुल वसूल करत असत. रयतेचा व राजाचा संबंध येत नसे. अधिकारी सर्व कर सरकारात भरत नसत त्यामुळेच राजांनी रयतवारी सुरू करून सरकारचा रयतेशी प्रत्यक्ष संबंध निर्माण केला, परिणामी रयतेवरील अत्याचार थांबून महसूलातही वाढझाली.[७]

जमीनीची प्रत्यक्ष मोजणी करून तिची प्रतवारी ठरविली व पिकानुसार साऱ्याचा योग्य दर ठरविला. रयतवारी पध्द्त अंमलात आणून पुर्वीच्या वतनदारांचे महत्व संपुष्टात आणले. महसुल वसुलीसाठी सरकारी अधिकारी नियुक्त करून त्यांच्यावर सरकारचे नियंत्रण ठेवले. त्यामुळे पूर्वीच्या मध्यस्थांकडून रयतेला होणारा त्रास नाहीसा झाला. तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी व लोककल्याणासाठी आपले शेतीविषयक धोरण राबविले.

**शेतीविषयक सुधारणा :—**

जमीनीची मोजणी शिवशाही काठीने केल्याने त्यात सुत्रबध्दता आली. जमीनीच्या प्रतवारीनुसार महसूल वसुल होत असे. रयतेचा वाटा रयतेस पावे व राजभाग आपणास येईते करणे , अशी आज्ञाच राजांनी दिली होती.

**शेतकऱ्यांना सवलती :—**

दुष्काळ किंवा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी शेतकऱ्यांना शेतसारा माफ केला जात असे. सुरक्षित व समृध्द् जीवन शेतकऱ्यांना जबता यावे यासाठी शिवाजी महाराज विशेष काळजी घेत असत.गरजुंना गुरे —ढोरे, बी — बियाणे, धान्य आदी पूरविले जात असे. सैन्याकडून पिकांची हानी होऊ नये म्हणून काळजी घेतली जाई. पडीक जमीन लागवडीखाली आणण्यास प्रोत्साहन दिले. फळबागांसाठी मदत दिली जात असे. शेतकरी सुखी तर राज्य सुखी हे सुत्र अंमलात आणले होते.[८]

**शेतीव्यवसायास उत्तेजन :—**

शेती हाच प्रमुख व्यवसाय असल्याने छ. शिवाजी महाराजांनी शेतीस विशेष उत्तेजन दिले, मात्र शेती सर्वस्वी निसर्गावर अवलंबून असे. गावात नव्याने येणाऱ्या लोकांना वस्तीसाठी व उदरनिर्वाहासाठी सर्व प्रकारची मदत दिली जाई. शेतकऱ्यांना बिगरव्याजी कर्ज दिले जाई. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात न लावण्याची अधिकाऱ्यांना राजांची ताकीद होती. विहीरी कालव्याव्दारे शेतीला पाणीपुरवठा केला जाई. विहीरीतून मोटेव्दारे शेतीला पाणी देण्याला मोटस्थळ तर कालव्याव्दारे पाणी देण्याला पाटस्थळ म्हणत असत.

नदी व तलावातील पाणी कालव्याव्दारे शेतीला पुरविण्यावर भर होता.[९]

**ओस पडलेल्या गावांचे पुनर्वसन :—**

अनेक वर्षे मोगलांची राजवट होती. या धामधुमीने गावेच्या गावे ओस पडली होती. राजांनी त्या गावच्या पाटील कुलकर्ण्यास बोलावून परागंदा झालेल्या रयतेस आपल्या गावी येण्यास प्रवृत्त करण्यासाठी आदेश दिले. अशा रयतेला राजाकडून विशेष सवलती मिळत असत. पहिल्या वर्षी महसुल माफ असे नंतर तो हळुहळु वाढविला जाई. शेतीसाठी बैल, नांगर, बियाणे,कर्ज पूरविले जाई.

**पडीक जमीन लागवडीखाली आणली :—**

शिवकाळात पडीक जमीन खुप होती, तुलनात्मकदश्ष्टया माणुसबळ कमी होते. अशा परिस्थितीत पडीक जमीन अधिकाधिक लागवडीखाली आणण्याचे काम प्रशासन करत असे. ही पडीक जमीन लागवडीखाली आल्यामुळे रयतेचेही कल्याण होई व सरकारच्या उत्पन्नातही वाढ होई.

**महसुल दर कमी ठेवला :—**

महाराजांनी मोगलकालीन जमीन महसुलापेक्षा महसुल दर कमी ठेवला. औरंगजेब आपला जमीन महसुल १ / २ इतका वसुल करत असे, मात्र शिवाजी महाराजांनी २ / ५ इतका वसुल घेत असत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पदरात अधिक उत्पन्न पडत असे व रयत सुखी समाधानी राहण्यास मदत होत असे.

**शेतकऱ्यांना सैन्यामध्ये संधी :—**

शेतावर राबणारा शेतकरी शेतात वर्षातून चार ते सहा महिने गुंतून राहत असे. बाकीच्या वेळी तो रिकामा राहत असे. महाराजोनी अशा हजारो शेतकऱ्यांना पायदळ, आरमार अशा ठिकाणी सैन्यात नोकरीची संधी दिली. त्यामुळे इतरही मार्गातून शेतकऱ्याला उत्पन्नाचे साधन मिळाले. शेतीबरोबर सैन्यातील नोकरी हा जोडव्यवसाय शेतकऱ्यांना मिळाल्यामुळे त्यांना विकासासाठी बराच वाव मिळाला.

**कारागिरांचा शेतीव्यवसायात सहभाग :—**

कारागिरांच्या चरितार्थाची जबाबदारी गाव स्वीकारत असे. कित्येकदा त्या कारागिरांना उदरनिर्वाहासाठी जमीनी तोडून दिल्या जात, मात्र सामान्यपणे या बलुत्यांना सुगीच्या काळात धान्याच्या रूपात मोबदला दिला जात असे.[११]

**दुष्काळ निवारणासाठी प्रयत्न :—**

छ. शिवाजी महाराज असहाय्य शेतकऱ्यांना दुष्काळात उदरनिर्वाहासाठी आर्थिक मदत करत असत. १६६५ च्या दुष्काळात पुणे प्रांतातील मांतरी येथील शेतकऱ्यांना अधिकाऱ्यांनी तातडीची मदत करून ५०० रूपयांची आर्थिक मदत देण्याचे आदेश दिलेले कागदपत्रात मिळतात. दुष्काळग्रस्तांना बैल, अवजारे, बी— बियाणे व कर्जेही दिली जात असत. दिलेली कर्जे शेतकऱ्यांकडे परत फेडण्याची ऐपत असली तरच मुदतीने वसुल करत ऐपत नसेल तर माफ केले जात असे. दुष्काळात अन्नछत्रे चालविणाऱ्या मठप्रमुखांना गुरांसाठी चारा उपलब्ध करून दिला जात असे. राजांनी चिंचवड मठाच्या मारया गोसावींना गवताची मदत देण्यासाठी अधिकाऱ्यांना आदेश दिल्याचा उल्लेख शिवकालीन कागदपत्रांत सापडतो. दुष्काळात धान्य महाग होऊ नये याची काळजीही घेतली जात असे.

**समारोप :—**

शिवकालीन कृषीविषयक धोरण शेतकऱ्यांच्या हिताबरोबरच सरकारच्याही फायद्याचे होते. छ. शिवाजी महाराजांनी रयतवारी पध्दत अंमलात आणली व मोगलांच्या काळात शेतसारा वसुलीत शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबविली. त्यामुळे शेतकऱ्यांवर सारा वसुल करणाऱ्या मध्यस्थांकडून होणारा अत्याचारही थांबला. तसेच छ. शिवाजी महाराजांनी पडीक जमीन लागवडीखाली आणली , ओस पडलेल्या गावांचे पुनर्वसन, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत, सुगीचे दिवस सोडून शेतकऱ्यांना सैन्यात संधी,कालवे व तलावाच्या सहाय्याने शेतीस पाणीपुरवठा इ. उपाययोजना प्रत्यक्षात अंमलात आणून शेतकरी व शेतमजुरांच्या कल्याणासाठी शेती क्षेत्राात सुधारणा केली. त्यामुळे आपोआपच स्वराज्याच्या तिजोरीतही मोठी भर पडण्यास मदत झाली.

आजचा शेतकरी नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींना सामोरा जात आहे. या आपत्तींवर सरकार उपाययोजना करत आहे, परंतु त्या अपुऱ्या पडत आहेत. त्याशिवाय सरकार आपत्ती निवारणासाठी ज्या

उपाययोजना राबवित आहे. त्या शेतकऱ्यांपर्यंत योग्य पध्दतीने पोहोचत नाहीत. त्यामुळे शेतकरी आर्थिक पेचात सापडला आहे. यातून मार्ग काढण्यासाठी शिवकालीन कृषीविषयक धोरणाचा अभ्यास करून, त्याप्रमाणे शेतकऱ्यांसाठी योजना राबविल्या तर शेतकऱ्यांचे जीवन समृध्द होण्यास मदत होईल.

संदर्भ सूची :–


१) डॉ.तांबोळी एन.एस.,मराठयांचा इतिहास, निराली प्रकाशन, पुणे,२०१०,पा.६.१७

२) डॉ.गणेश राऊत, छ.शिवाजी व शिवकाल,डायमंड प्रकाशन,पुणे२०१३,पा.१२०

३) डॉ.जयसिंगराव पवार, छ.शिवाजी व शिवकाल,फडके प्रकाशन,कोल्हापूर,पा.२१८,२१९.

४) प्रा.मदन मार्डीकर, मराठयांचा इतिहास, विद्याबुक्स पब्लिशर्स औरंगाबाद,पा.४०२,४०३.

५) डॉ.जयसिंगराव पवार, छ.शिवाजी व शिवकाल,फडके प्रकाशन,कोल्हापूर,पा.२१९.

६) प्रा.मदन मार्डीकर, मराठयांचा इतिहास, विद्याबुक्स पब्लिशर्स औरंगाबाद,पा.४०३.

७) डॉ. सोमनाथ रोडे, मराठयांचा इतिहास, पिंपळापुरे पब्लिकेशन नागपूर,१९९८,पा.१६७

८) कित्ता १६८.

९) प्रा.मदन मार्डीकर, मराठयांचा इतिहास, विद्याबुक्स पब्लिशर्स औरंगाबाद,पा.४०२.

१०) डॉ.जयसिंगराव पवार, छ.शिवाजी व शिवकाल,फडके प्रकाशन,कोल्हापूर,पा.२२०.

११) प्रा.मदन मार्डीकर, मराठयांचा इतिहास, विद्याबुक्स पब्लिशर्स औरंगाबाद,पा.४०३.


❑❑❑

**02**

# ऐतिहासिक मराठी चित्रपटातून व्यक्त झालेला मराठ्यांचा इतिहास


प्रा.के.जे.चव्हाण

इतिहास विभाग प्रमुख,

अनंतराव थोपटे महाविद्यालय, भोर


**********

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्रातील जनमाणसांची दोन महत्वाची श्रद्धास्थाने, एक वारकऱ्यांचे विठोबा व दुसरे धारकऱ्यांचे शिवबा. एक भक्तीचे दयोतक, तर दुसरे भक्ती शक्ती–युक्तीचे प्रेरक. विठोबा व शिवबा यांचा महाराष्ट्रातील लोकमनावर विलक्षण प्रभाव आहे. आजवर महाराष्ट्रात विविध माध्यमातून त्यांची महती जन सामान्यापर्यत पोहचविण्याचा अविरत प्रयत्न केला आहे. विविध कला, कथा, कादंबऱ्या, लोककला, काव्य, नाटक, चित्रपट या सर्वांनी त्यांचे महत्व लोकापर्यंत पोहचविण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. यातील चित्रपट हे माध्यम फारच प्रभावी ठरलेले आहे. विशेषत: मराठ्यांचा वैभवशाली इतिहास मांडणारे आजपर्यत महाराष्ट्रात अनेक चित्रपट निर्माण झाले.

या ऐतिहासिक चित्रपटांच्या निर्मितीचा कालखंड त्याचे स्वरूप, इतिहास लोकांपर्यत मांडण्याचा त्यांचा प्रयत्न. याचा संशोधनात्मक दृष्टीकोनातून अभ्यास करण्याचा केलेला हा एक प्रयत्न आहे.

**चित्रपटांचा उदयकाळ:**

शब्द माध्यमांनी साहित्याला व प्रतिमा माध्यमांनी चित्रपटाला जन्म दिला. प्रथम चलपट नंतर मुकपट व त्यानंतर बोलपट असा चित्रपटांचा प्रवास झाला. फ्रान्सच्या लुमिए बंधुनी २८ डिसेंबर १८९५ ला पॅरिस येथील कॅफेत 'द अरायव्हल ऑफ–द–ट्रेन' हा दिड मिनिटांचा पहिला चलपट दाखविला. १८९७